# ‘आवड जाणून त्याच क्षेत्रामध्ये करिअर करा’

**पुणे, ता. १० :** ''आपल्याला काय हवंय ते समजून घेऊन उत्तम करण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला जे आवडेल, त्याच क्षेत्रात करिअर करा,'' असा संदेश रिझर्व्ह बॅंकेचे गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कोंढवा येथील राष्ट्रीय बॅंक व्यवस्थापन संस्थेच्या दीक्षांत सोहळ्यात शुक्रवारी राजन बोलत होते. केंद्र शासनाचे प्रमुख वित्त सल्लागार डॉ. अरविंद सुब्रमणियन, डॉ. अचिंतन भट्टाचार्य उपस्थित होते.

राजन म्हणाले, ''सतत नवनवीन आव्हानांचा सामना करण्यातच जगण्याची खरी मजा आहे. आजचे तरुण जेवढा म्हणून चाकोरीबाह्य विचार करतील आणि 'कम्फर्ट झोन' मधून बाहेर पडतील, तेवढे ते अधिक पुढे जातील.''

सुब्रमणियन म्हणाले, ''जगातील सर्वांत मोठी व स्थिर लोकशाही असलेल्या आपल्या देशाने इतर लोकशाही देशांच्या तुलनेत राजकीय, आर्थिक व सामाजिक अशा तीनही क्षेत्रांत महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. देशात १९९१ मध्ये सुरू झालेल्या उदारीकरणाच्या पर्वामुळे आर्थिक सुधारणांनी वेग धरला. त्यामुळे आपला आर्थिक विकासदरसुद्धा विशिष्ट उंचीवर टिकून राहू शकला. आर्थिक मंदीच्या झळा भारताला इतर देशांच्या तुलनेत कमी बसल्या.''

## स्पर्धात्मक संघराज्यवाद आल्यास...

**देशातील विविध राज्यांनी विकासाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून एकमेकांशीच निकोप आर्थिक स्पर्धा केली, तर हा स्पर्धात्मक संघराज्यवाद (कॉम्पिटिटिव्ह फेडरलिझम) देशाच्या एकूण आर्थिक विकासाच्या दृष्टीने सकारात्मक ठरू शकेल. एक विकसित राज्य दुसऱ्याचे 'मॉडेल' ठरल्यास ते देशाला हवेच आहे, असेही सुब्रमणियन यांनी सांगितले.**